स्क्रीन रिडरचा बादशहा

• सांज दैनिक बीड • RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

बीड • रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ • वर्ष २० वे • पाने ४ http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com • किंमत ३ रुपये


# दीड दिवस शाळेत गेले, पण साहित्यातून सामाजिक क्रांती पेटवणारे अण्णा भाऊ साठे मानवमुक्ती लढ्याचे नायक ठरले!!

## आ. अमित गोरखे यांनी दिंद्रुड येथील साठे जयंतीमध्ये व्यक्त केले विचार

### अण्णा भाऊंनी केवळ भूक आणि अश्रूंची कथा लिहिली नाही, तर बहुजनांच्या इतिहासाची गौरवगाथा लिहिली : डॉ. ओमप्रकाश शेटे

### अंधश्रद्धा, अशिक्षितपणा, दारिद्र्य व सामाजिक विषमतेवर प्रहार करणारा रिअल हिरो म्हणजेच अण्णा भाऊ साठे!!

### अण्णा भाऊंचे लेखन सामाजिक, राजकीय दृष्ट्या कृतिशीलतेवर आधारल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोलाचे योगदान!

दिंद्रुड : अण्णा भाऊ साठे यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतीशीलतेवर आधारलेले होते. अण्णा भाऊ हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. जाती व्यवस्थेच्या चटक्याने ज्यांना अवघ्या दीड दिवस शाळेत शिक्षण मिळाले. पण, आपल्या लेखणीतून कष्टकरी, सर्वाहारा, उपेक्षित वर्गाच्या वेदना जगासमोर मांडणारे लोकशाहीर कॉम्रेड अण्णाभाऊ साठे नायक ठरले. एवढेच नव्हे तर दीड दिवस शाळेत गेले, पण साहित्यातून सामाजिक क्रांती पेटवणारे अण्णा भाऊ साठे मानवमुक्ती लढ्याचे नायक ठरले, असे विचार आ. अमित गोरखे यांनी व्यक्त केले. दरम्यान डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, अण्णा भाऊंनी केवळ भूक आणि अश्रूंची कथा लिहिली नाही, तर बहुजनांच्या इतिहासाची गौरवगाथा लिहिली. अंधश्रद्धा, अशिक्षितपणा, दारिद्र्य व सामाजिक विषमतेवर प्रहार करणारा रिअल हिरो म्हणजेच अण्णा भाऊ साठे हे होय.



### समतामूलक समाज निर्माण व्हावा, ही वैश्विक भूमिका अण्णा भाऊंनी साहित्यातून मांडली!

विज्ञानवादी, वास्तववादी लेखन करणारे मानवतावादी साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांनी कसलीच विषमता नसलेला समतामूलक समाज निर्माण व्हावा, ही वैश्विक भूमिका आपल्या साहित्यातून मांडली. सामाजिक, राष्ट्रीय ऐक्याचा संदेश त्यांनी आपल्या समग्र लेखणीतून दिला. जात, धर्म, लिंग, भाषा, प्रांत हे सर्व भेदाभेद दूर सारून, माणसांमध्ये माणुसकी पेरून सर्व प्रकारची दूरी मिटवून सर्व स्तरातील माणसांमध्ये समन्वय घडून आणणारे ते साहित्यिक होते. म्हणूनच स्त्रियांना आपल्या साहित्यात सन्मानाने नायिका करणारे आणि स्त्रीशक्ती, राष्ट्रशक्ती हे जाणणारा हा वाटेगावचा वाटाड्या समतेची मशाल घेऊन, मुंबई वाया रशियाला गेला, असे विचार बंडू खांडेकर यांनी व्यक्त केले.



### यांची होती उपस्थिती

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती तर उद्घाटक म्हणून लोकाभिमुख तथा लोकप्रिय आ. अमित गोरखे, मानवी हक्क अभियानाचे अध्यक्ष प्रा मिलिंद एकनाथराव आव्हाड, बंडू खांडेकर, संपादक दीपक थोरात अमोल शेरकर यांची यांच्यासह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. असेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक बाबा कांबळे, गरिबा चौरे, विशाल गवळी, अनिल शिंदे, प्रकाश शिंदे, राहुल आरे, बाबुराव कांबळे, महेश लोखंडे, बालू कांबळे, महादेव शिंदे आदींनी श्रम घेतले.

### महाराष्ट्र भूमी घामाची, श्रमाची, प्रेमाची, संत शाहिरांची, त्यागाच्या तलवारीची : डॉ. शेटे

महाराष्ट्र हि भूमी घामाची, श्रमाची, प्रेमाची, संत शाहिरांची, त्यागाच्या तलवारीची आहे, असे सांगणारे अण्णा भाऊ साठे हे जनतेची वेदना जाणणारे, जनतेच्या मनभावना ओळखणारे, जनतेची कदर करणारे, लोकशाहीर होते. या जगाचा मूळ नायक असलेल्या माणसाचं आत्मबल जागं करणारं लेखन त्यांनी केलं. माणसांवर, जगावर, जगण्यावर आणि जीवनावर नितांत प्रेम असलेले अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, एक शाहीर, एक प्रवास वर्णन, १६ नाटके-नाटिका इतकं साहित्य लिहिलं आहे. या सर्व साहित्यांतून त्यांनी एकता आणि समतेची शिकवण दिल्याचं प्रकर्षाने आपल्याला जाणवतं. जीवन यात्री कथाकार अण्णा भाऊ साठे यांची जीवनावर निष्ठा होती. ते मानवमुक्ती लढ्याचे नायक होते. त्यांनी केवळ भूक आणि अश्रूंची कथा लिहिली नाही, तर त्यांनी बहुजनांच्या इतिहासाची गौरवगाथा लिहिली, असे कृतीला प्रवृत्त करणारे विचार भारत मिशन समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले.

### अण्णा भाऊंचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले!

अण्णा भाऊ साठे यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. अण्णाभाऊ हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कॉम्रेड अमर शेख आणि लाल बावटा कलापथकाद्वारे त्यांनी प्रबोधनाचे काम केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. एकूणच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून सभोवतालचे वास्तव निर्भीडपणे मांडले, असे मौलिक विचार आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केले.

मराठा आंदोलनातील मोठी घडामोड ➤ घडामोठींना प्रचंड वेग

## शरद पवार मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार!





मुंबई : मराठा आरक्षणासाठी मागील तीन दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदान इथं मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात उपोषण आंदोलन सुरू आहे. राज्यभरातील मराठा समाजबांधव मुंबईत दाखल झालेले असताना जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी नेत्यांसह आमदार-खासदारही आझाद मैदानात जरांगे पाटील यांची भेट घेत आहेत.

अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हेदेखील आझाद मैदानात येण्याची शक्यता वर्तवली असून आज सायंकाळी ते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार असल्याचे समजते.

महाविकास आघाडीतील नेतेही या आरक्षण प्रश्नावरून कोणती भूमिका घ्यावी, याबाबत संभ्रमात आहे.

मात्र आता शरद पवार हे थेट मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आझाद मैदान इथं जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र याबाबत अद्याप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून अधिकृतरीत्या माहिती देण्यात आलेली नाही.

## कड्याचे माजी सरपंच संपत सांगळे यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन

### हजारोच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार

आष्टी : कडा शहराचे माजी सरपंच तथा उद्योगपती संपत दादा सांगळे यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर कडा येथील स्मशानभूमीत हजारोंच्या संख्येने जनसमुदायच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अतिशय मनमिळाऊ, शांत, संयमी असे व्यक्तिमत्त्व असलेले कडा शहराचे माजी सरपंच संपत सांगळे यांचे शनिवार (दि.३०) रोजी दुपारी ४ च्या दरम्यान हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५० होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर कडा येथील स्मशानभूमीत रात्री ७.३० वा. हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.



## भिसेवाडीचे जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी थेट विधानभवनात

### विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांनी आयोजित केला होता अभ्यासदौरा.....

वैजापूर : विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने निरोप घेतला. त्यांनी शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी येथील विद्यार्थ्यांना विधानभवनाच्या अभ्यासदौऱ्यासाठी नेले आणि त्यांना लोकशाहीच्या कार्याची ओळख करून दिली.

यावेळी आगळीवेगळी निरोप भेट विरोधी पक्ष नेते आ अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ पूर्ण होत होता. यानिमित्ताने त्यांनी औपचारिक निरोप समारंभापेक्षा एक वेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम निवडला.

● पान ४ वर...

विशेष

## चेहऱ्यावर मुरमं येण्याची कारणे आणि उपाय जाणून घ्या



चेहऱ्यावर पिंपल्स किंवा मुरूम येण्याची समस्या अनेक तरुण तरुणींमध्ये होत असते. पिंपल्सचा परिणाम चेहऱ्याच्या सौंदर्यावर होत असतो. याला तारुण्यपिटिका, मुरुमे, पिंपल्स किंवा वैद्यकीय भाषेत असेही म्हणतात. चेहऱ्यावर मुरमं, पुटकुळ्यामुळे चेहऱ्यावर जखमा आणि व्रण पडतात. शिवाय सौंदर्यही कमी होतं. त्यावर वेळीच उपाय केले नाहीत, तर ही मुरमं वाढत जातात. काही घरगुती उपायांद्वारे पावसाळ्यात त्वचेच्या समस्या दूर करता येऊ शकतात.

### बॉडीलोशन

■ बॉडीलोशनमध्ये मोठ्या प्रमाणात तूपचा वापर केला जातो. बॉडीलोशन हे विशेषत: बॉडीसाठी असल्यामुळे चेहऱ्यावर लावल्याने अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.

### मसालेदार, फास्ट फूड


■ मोठ्या प्रमाणात पिझ्झा, बर्गर, अशा फास्ट फूडचे सेवन केल्यास मुरमांना आमंत्रण देण्यासारखं आहे. दररोज फास्ट फूड खाणे त्वचेसाठी अत्यंत हानिकारक आहे. त्यात कॅलरी, चरबी आणि परिष्कृत कार्बोहायड्रेट्स देखील जास्त आहेत. रोज मसालेदार जेवण हेही आरोग्यासाठी हानिकारक तर आहेच पण आपल्या त्वचेला देखील याचा परिणाम होतो. मसालेदार पदार्थांनामध्ये अनेक मसाल्यांचा समावेश केला जातो जे आपल्या त्वचेला हानी पोचवू शकतात.

### जास्त गोड खाणे

■ बऱ्याचदा आपण जास्त गोड़ खातो केक, मिठाई, चॉकलेट, इत्यादी पदार्थांचे मोठ्या प्रमाणात सेवन केल्यास मुरम येतात.

### मोबाईलचा जास्त वापर

■ जर आपण फोनवर बराच वेळ बोलत राहिलो तर त्यातील बॅक्टेरिया त्वचेची छिद्रे बंद करतात. त्यामुळे पिंपल्सची समस्या सुरू होते.



### स्वच्छता न ठेवणे

■ केसात जर खूप कोंडा असेल तर त्या कोंड्यामुळे त्वचेची छिद्रे बंद होतात. त्यामुळे मुरमांची समस्या निर्माण होऊ शकते. मेकअप न काढल्यामुळे किंवा खूप वेळ चेहरा ना धुत्यामुळे चेहऱ्यावर पुरळ, डाग येतात.

### धूम्रपान

■ नियमित धूम्रपान केल्यामुळे त्वचेला योग्यरित्या आक्सिजन मिळत नाही त्यामुळे चेहरा निस्तेज दिसणं, डाग, पुरळ इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागते.

### केमिकल प्रोडक्स्टस

■ सुंदर दिसण्यासाठी अनेक जण चेहऱ्यावर विविध प्रकारचे क्रीम, अनेक प्रोडक्स्टस वापरतात. यात मोठ्या प्रमाणात केमिकल असत त्याचबरोबर अनेक दुष्परिणाम त्यामुळे त्वचेला अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते.

### चेहऱ्यावर पिंपल्स किंवा मुरूमांवर उपाय :

■ गुलाबपाणी आणि ग्लिसरीनच्या मदतीने तुम्ही त्वचेच्या कोरडेपणापासून दूर होऊ शकता. तेव्हा ग्लिसरीनमध्ये गुलाबपाणी मिक्स करून ते चेहेऱ्यावर लावा आणि काहीवेळाने चेहेरा स्वच्छ धुवा. यामुळे त्वचेची आद्रता टिकून राहते आणि चेहरा तेजस्वी दिसू लागतो.



■ बेसन किंवा चणा डाळीचं पीठ घराघरांत उपलब्ध असतं. त्याचा वापर पूर्वापार आपल्या सौंदर्यप्रसाधनांसाठी केला जातो. बेसनापासून एक फेसपॅक तयार करता येतो. एका वाटीत एक चमचा बेसन पीठ घेऊन त्यात थोडं पाणी मिसळा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळानं धुऊन टाका. यामुळे चेहऱ्यावर चमक येईल.

■ बदाम खाल्ल्याने अनेक पोषणमूल्यं मिळतात. बुद्धी आणि केसांसाठी बदाम उपयुक्त असतात, तसेच ते चेहऱ्याच्या त्वचेसाठीही फायदेशीर असतात. बदाम आणि संत्रं एकत्र वाटून घ्या. हे मिश्रण अर्धा तास चेहऱ्यावर लावा. त्यानंतर चेहरा धुवा. यामुळे मुरमं, पुटकुळ्यांचे डाग कमी होतील आणि चेहरा तजेलदार दिसेल.

# हल्ले थांबणार तरी कधी?



सकाळी साधारणत: साडेआठ वाजता आरती यादव नावाची 22 वर्षीय तरुणी वसई पूर्व येथील वालीवमध्ये असलेल्या चिंचपाडा येथे कामास जात होती. यावेळी भररस्त्यात अचानकपणे तिच्यावर मागून रोहित यादव (वय वर्ष 28) नामक तरुणाने हल्ला केला. या हल्ल्यात तरुणीचा जागीच मृत्यू झाला. या नराधमाने लोखंडी पान्याने 16 वार करत या तरुणीचा जीव घेतला. प्रेमप्रकरणातून दिवसाढवळ्या नागरिकांची वर्दळ असताना ही घटना घडल्याने वसईत खळबळ उडाली आहे.

वसईतील या घटनेमधील तरुण-तरुणी यांच्यात प्रेमसंबंध होते. पण आरोपीला प्रेयसीच्या चारित्र्यावर संशय असल्याने ही घटना घडल्याची माहिती वसई पूर्व येथील वालीव पोलिसांकडून देण्यात आली आहे. परंतु, दिवसाढवळ्या आणि बघ्यांच्या गर्दीत घडलेल्या या घटनेनंतर महिलांवरील जीवघेणे हल्ले थांबणार कधी? असा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा निर्माण झाला आहे. वसईतील हत्येच्या घटनेमधील आरोपी रोहित यादव याला पोलिसांनी अटक केली आहे. पण यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वसई किंवा वसईच्या आजूबाजूच्या शहरांमध्ये अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. ज्यामुळे महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न अनेकवेळा निर्माण झाले आहेत. दुर्दैवाने महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात अशा घटना सातत्याने घडत आहेत. पण यातील काही प्रकरणे अशी आहेत, ज्यामुळे माणुसकीला तर काळिमा फासलाच आहे, पण महिलांवर होणाऱ्या जीवघेण्या हल्ल्यांमुळे केवळ राज्यच नाही तर देशही हादरला आहे.

### रिंकू पाटीलला जिवंत जाळले

■ महिलांवरील जीवघेणे हल्ले म्हटले की, सर्वात पहिल्यांदा आठवते ते रिंकू पाटील हत्याकांड. कारण या घटनेत 10 वीच्या परीक्षा केंद्रातच रिंकू पाटील नावाच्या विद्यार्थीनीला पेट्रोल टाकून जाळण्यात आले होते. 30 मार्च 1990 ला उल्हासनगरमध्ये दहावीची परीक्षा सुरू असतानाच परीक्षा केंद्रात आगडोंब उसळला. हातात तलवार, पिस्तूल आणि पेट्रोलचा कॅन घेऊन 4 जण परीक्षा केंद्रात घुसले. त्यांनी बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांवरही हल्ला केला आणि रिंकूला जिवंत जाळले. या घटनेनंतर जागेवरच रिंकूचा कोळसा झाला, अशा बातम्या प्रसारित झाल्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे हे कृत्य रिंकूच्या शेजारी राहणाऱ्या 22 वर्षांच्या हरेश पटेलने केले होतं. त्याचे रिंकूवर एकतर्फी प्रेम होते. रिंकूने लग्नास नकार दिला म्हणून त्याने अशा पद्धतीने सूड उगवला होता. या घटनेनंतर हरेशनेही रेल्वेखाली येऊन आत्महत्या केली होती.

### विद्या प्रभूदेसाईची अमानुषपणे हत्या

■ रिंकू पाटील हत्येच्या 10 वर्षानंतर म्हणजेच 23 जून 2000 साली ऑफिसल जाणाऱ्या विद्या प्रभूदेसाईची भरदिवसा जाळून हत्या करण्यात आली. एकतर्फी प्रेमातून त्यावेळी ही घटना घडली होती. मुंबई सेंट्रल येथे घडलेल्या या घटनेनंतर मुंबई हादरली होती. 23 जून 2000 या दिवशी विद्या ऑफिसला जाण्यासाठी बसची वाट पाहत उभी होती. त्याचवेळी तिच्यावर एकतर्फी प्रेम करणाऱ्या रसिक सोलंकी याने तिच्या अंगावर केरोसीन टाकून तिला जिवंत जाळले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये कामास असलेली विद्या ही रसिककडे तिचे कपडे शिवून घेत असे. व्यवसायाने टेलर असलेल्या रसिकचे विद्यावर प्रेम जडले होते. त्याने तिला लग्नासाठी अनेकदा मागणी देखील घातली होती. पण विद्या वारंवार नकार देत असल्याने या रागातून रसिकने तिची हत्या केली होती. याप्रकरणी न्यायालयानं रसिकला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

### एकतर्फी प्रेमातून प्राची झाडेची हत्या

ऑगस्ट 2018मध्ये ठाण्यात भरदिवसा घडलेल्या हत्येच्या घटनेने खळबळ उडाली होती. ठाण्यातील बेडेकर कॉलेजमध्ये बीकॉमच्या दुसऱ्या वर्षाला शिक्षण घेत नोकरी करणाऱ्या प्राची झाडे या तरुणीवर सपासप वार

विशेष

करून तिची हत्या करण्यात आली होती. प्राची ही कोपरी कॉलनीतील किशोर नगर परिसरात राहत होती. सकाळी अकराच्या सुमारास बाईकवरून ती ऑफिसला निघाली होती. पूर्व द्रुतगती मार्गावरून जात असताना ठाण्यातील नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयानजीक भिवंडी येथे राहणाऱ्या 22 वर्षीय आकाश पवार या आरोपीने प्राचीवर चाकूने वार केले आणि त्यानंतर तो तिथून पळून गेला. एकतर्फी प्रेमातून आकाशने प्राचीची हत्या केली होती.

### हिंगणघाटच्या जळीतकांडाने महाराष्ट्र हादरला



■ महाराष्ट्रात आजवर अनेक जळीतकांड घडले आहेत. पण वर्ध्यातील हिंगणघाट येथे घडलेल्या जळीतकाडांने महाराष्ट्र हादरला होता. 03 फेब्रुवारी 2022 रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील नंदोरी चौकात एका 25 वर्षीय तरुणीवर पेट्रोल टाकून तिला जाळण्यात आले. या घटनेत 40 टक्के भाजलेल्या पीडित तरुणीला उपचारासाठी नागपूर येथील ऑरेंज सिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण तिची मृत्यूशी सुरू असलेली झुंज 10 फेब्रुवारी 2020 ला संपली आणि तीने जगाचा निरोप घेतला. या घटनेतील 25 वर्षीय तरुणी नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी घराबाहेर पडली होती. त्यावेळी तिचा कोणी पाठलागावर करत आहे, याची तिला जाणीवही नव्हती. ती हिंगणघाटातील नंदेरी चौकात पोहोचली, तेव्हा मागावर असणाऱ्या तरुणाने तिच्या अंगावर पेट्रोल टाकले आणि तिला पेटवून दिले. त्यानंतर जराही न थांबता हा आरोपी तिथून फरार झाला.

हिंगणघाटमध्ये घडलेल्या या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. या घटनेविरोधात अनेक मोर्चे निघाले. राजकीय नेत्यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. हिंगणघाट तसेच वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूरमध्येही नागरिकांनी बंद पुकारत या घटनेचा निषेध करण्यात आला होता. परंतु, या घटनेनंतर महिलांच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.

### एमपीएससी टॉपर दर्शनाची मित्राने केली हत्या

■ राज्यात महिलांवर होणाऱ्या जीवघेण्या हल्ल्यांच्या घटना ताजा असतानाच एमपीएससी टॉपर दर्शना पवार हिच्या हत्येचे घटनेने खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा पोलिसांनी तपास केल्यानंतर दर्शनाचा मित्र राहुल हंडोरे याला अटक करण्यात आली. एमपीएससी टॉपर दर्शना पवार (वय वर्ष 26) हिचा मृतदेह पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगडाच्या पायथ्याजवळ 18 जून 2023 रोजी सापडला होता. मूळची अहमदनगर जिल्ह्यातील रहिवासी असलेली दर्शनाने MPSC परीक्षेत यश मिळवले होते. परिक्षेत पास झाल्यानंतर ती सत्कार स्वीकारण्यासाठी पुण्यात आली होती. पण 10 जूनपासून तिचा कुटुंबीयांशी संपर्क तुटला. अखेर, तिचा राजगड किल्ल्यावर खून करण्यात आल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. यानंतर फरार असलेला तिचा मित्र राहुल हांडोरे याला चार दिवसांनंतर पोलिसांनी अटक केली.

### एकतर्फी प्रेमातून 12 वर्षाच्या मुलीची हत्या

■ महाराष्ट्रात 2023 या वर्षात महिलांच्या अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. पुण्यातील दर्शना पवार हिच्या हत्येची घटना ताजी असतानाच मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कल्याणमध्ये एका 12 वर्षीय मुलीची एकतर्फी प्रेमातून हत्या करण्यात आली. कल्याणच्या तिसगाव परिसरात 12 वर्षीय मुलीची 25 वर्षाच्या तरुणाने हत्या केल्याने खळबळ उडाली होती. 16 ऑगस्टला संध्याकाळी मुलगी आईसोबत घरी जात असताना आरोपीने तिच्यावर चाकूने सात ते आठ वार केले. त्यानंतर स्वत: फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावत आरोपीला बेड्या ठोकल्या. प्रणिती दास असे या घटनेत मृत्यू झालेल्या 12 वर्षीय तरुणीचे नाव होते.

### मुंबईतील तरुणीची दिल्लीत निर्घृण हत्या

■ श्रद्धा वालकर हत्याकांडाने तर संपूर्ण देशात खळबळ उडवून दिली होती. एका मुंबईतील तरुणीची दिल्लीत हत्या झाल्यानंतर देश हादरला होता. वसईतील श्रद्धा वालकर (वय वर्ष 28) ही तरुणी प्रियकर आफताब पूनावाला याच्यासोबत दिल्लीत राहत होती. मे 2022 मध्ये आफताबने तिची हत्या केली. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने तिच्या शरीराचे काही तुकडे गुरगाव येथील जंगलात फेकून दिले. काही तुकडे फ्रिजमध्ये ठेवले. करवत आणि धारदार सुऱ्याने त्याने हे तुकडे केले. तसेच हे तुकडे त्याने दिल्लीतील विविध भागात टाकून दिले होते. 14 नोव्हेंबर रोजी हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर खळबळ उडाली होती.

# झटपट वजन वाढवण्यासाठी

## तुमच्या आहारात करा या पदार्थांचा समावेश

काही लोक वजन कमी करण्यासाठी खूप मेहनत घेतात, तर काही लोक वजन वाढवण्यासाठी नवीन गोष्टी वापरतात. होय, वजन कमी करणे जितके कठीण आहे तितकेच वजन वाढवणे कठीण आहे. विशेषत: अशा लोकांसाठी ज्यांची प्रतिकारशक्ती आणि चयापचय आवश्यकतेपेक्षा जास्त आहे. खूप पातळ असणे किंवा वजन न वाढणे हे देखील काही आजाराचे लक्षण असू शकते. वजन वाढवण्यात आहार महत्त्वाची भूमिका बजावतो.

विशेषत: मसल्स बनवण्यासाठी जास्त कॅलरी आणि प्रथिनयुक्त आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. वजन वाढवण्यासाठी बरेच लोक जास्त प्रमाणात तूप आणि दुधाचा वापर करतात, परंतु आहारात फक्त तूप आणि दूध न ठेवता उच्च कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्सचा समावेश करणे आवश्यक आहे.

### कर्बोदके

वजन वाढवण्यात कर्बोदके महत्त्वाची भूमिका बजावतात. मेडिकल न्यूज टुडेच्या मते, कार्ब्स हे एक पोषक तत्व आहे जे शरीराला ऊर्जा देण्यासाठी वापरले जाते. ज्यांना वजन वाढवायचे आहे त्यांनी आपल्या आहारात गहू, मैदा, बटाटा, पास्ता आणि तांदूळ यांचा समावेश करावा.

### तांदूळ

भातामध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण जास्त असते ज्यामुळे वजन वाढण्यास मदत होते. 100 ग्रॅम तांदळात अंदाजे 357 कॅलरीज असतात. याच्या नियमित सेवनाने



विशेष

वजन वाढवता येते.

### संपूर्ण धान्य ब्रेड

संपूर्ण धान्य ब्रेडमध्ये कॉम्प्लेक्स कार्ब असतात. वजन वाढवण्यासाठी व्हाईट ब्रेडचे सेवन केले जाऊ शकते, त्यात भरपूर कार्ब्स आणि प्रोटीन असतात. ब्रेडमध्ये तूप आणि दूध मिसळल्याने वजन झपाट्याने वाढू शकते.

### सुका मेवा

सुक्या मेव्यामध्ये फ्रक्टोज असते जे गोडाचे काम करते. हे एक नैसर्गिक स्वीटनर आहे जे अन्नातील कॅलरीज वाढवण्याचे काम करू शकते. हे दलिया, ओट्स आणि दही मिसळून खाऊ शकता.

### गडद चॉकलेट

चॉकलेट कोको बीन्सपासून मिळते ज्यात कार्बोहायड्रेट्स भरपूर असतात. दुधाच्या चॉकलेटपेक्षा डार्क चॉकलेटमध्ये कमी साखर आणि जास्त कोको असतो. त्यात अँटी-ऑक्सिडंट्सही जास्त असतात.

### सॅल्मन

सॅल्मन हा प्रथिने आणि निरोगी चरबीचा चांगला स्रोत मानला जातो. त्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिडचे प्रमाणही जास्त असते, जे वजन वाढवण्यासाठी, मेंदू आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठी उत्कृष्ट मानले जाते.

### चीज

चीज म्हणजेच पनीर हे एक दुग्धजन्य पदार्थ आहे ज्यामध्ये जास्त कॅलरीज असतात. त्यात प्रोटीन आणि कॅल्शियम देखील असते जे दात आणि केसांसाठी फायदेशीर आहे .वजन वाढवण्यासाठी आहाराकडे विशेष लक्ष द्यावे लागते. आहारात कार्ब्स, प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण वाढवता येते. कोणताही आहार घेण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्या.

# भारताची अर्थव्यवस्था

● पान ३ वरून...

त्याच वेळी राष्ट्रीयीकृत बँकांनी थकित कर्जापोटी दहा लाख कोटी रूपयांहून अधिक रक्कम वसूल केली आहे. यामुळे सरकारची तिजोरी भरभक्कम होणार आहे. ईडी किंवा अंमलबजावणी खात्याने १,१०५ बैंक फसवणूक प्रकरणांची चौकशी केली आणि ती पूर्ण होऊन या गुन्ह्यांमधील ६४ हजार कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. त्याचा परिणाम असा झाला, की गेल्या वर्षअखेरपर्यंत १५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता राष्ट्रीयीकृत बँकांकडे वळती करण्यात आली. भरीस भर म्हणून, की काय देशातील बँकिंग क्षेत्राचा एकत्रित निव्वळ नफा २०२३-२४ मध्ये प्रथमच ३० लाख कोटी रुपयांच्या पार गेला. अर्थात नेहमीप्रमाणे सरकारी बँकांपेक्षा खाजगी बँकांचा कारभार अधिक चांगला ठरला. म्हणूनच सरकारी बँकांचा निव्वळ नफा एक लक्ष ४१ हजार कोटी रूपयांचा आहे तर खाजगी बँकांचा एकत्रित निव्वळ नफा एक लाख ७८ हजार कोटी रुपये इतका आहे. अर्थात सरकारी बँकांवर केंद्र सरकार टाकते तशा जबाबदाऱ्या खाजगी बँकांवर नसतात हे लक्षात घेतले पाहिजे.

आणखी एक सुवार्ता म्हणजे, भारताने ब्रिटनमध्ये ठेवलेले १०० टन सोने संपलेल्या आर्थिक वर्षात भारताच्या तिजोरीत हलवण्यात आले आहे. १९९१ मध्ये भारताची परकीय चलनाची गंगाजळी आटली होती. याचे कारण त्या अगोदर व्ही. पी. सिंग सरकार कोसळले होते. देशात मंदिर-मंडल वाद सुरू झाला होता. त्यानंतर चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखालील सरकार अस्तित्वात आले. ते अत्यंत कमजोर होते. दुसरीकडे आखाती युद्धही सुरू झाले होते. इंधनाचे भाव भडकले होते. देशाला आवश्यक वस्तू आणि यंत्रसामग्री आणि कच्चे तेल वगैरे आयात करण्यासाठी लागणारे डॉलरदेखील आपल्याकडे नव्हते. आता मात्र हे सोने पुन्हा भारतात आल्यामुळे, रिझर्व बँकेकडील सोन्याचा साठा प्रचंड वाढला आहे. मौल्यवान धातू असलेल्या सोन्याचा बराचसा भाग परदेशात साठवला जातो. म्हणूनच इतर देशांप्रमाणेच भारताचे सोनेही बँक ऑफ इंग्लंडकडे होते. एप्रिल २०२३ मध्ये कोळसा, तेल, नैसर्गिक वायू, ऊर्जा, इंधन शुद्धीकरण उत्पादने, पोलाद, सिमेंट आणि खते या पायाभूत क्षेत्रांनी सरासरी ६.२ टक्के दराने वाढ नोंदवली आहे. याचा अर्थ इतर क्षेत्रांमधून या उत्पादनांना चांगली मागणी आहे. हे अर्थव्यवस्था सुदृढ बनत असल्याचे लक्षण मानावे लागेल. मुळात जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचे स्थान कायम राहिले आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात देशाच्या सकल उत्पादनाने म्हणजेच जीडीपीने ८.२ टक्क्यांची वाढ नोंदवल्याची घोषणा नुकतीच केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाने केली आहे. २०२२-२३ या संपूर्ण आर्थिक वर्षात हा दर सात टक्के होता. उत्पादन क्षेत्राच्या सरस कामगिरीमुळेच हे शक्य झाले आहे. खनिज, उत्खनन तसेच बांधकामक्षेत्रातील वाढीने अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. मात्र कृषी क्षेत्रातील विकासाचा वेग मंदावला आहे. आजही देशातील बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत. अशा वेळी कृषी विकासाचा वेग अधिक असणे आवश्यक आहे. शेतीमालाला वाजवी आधारभाव नसणे, शेतीच्या निर्यातीवर बंदी आणि निबंध तसेच अनावश्यक शेतीमालाची आयात करणे अशा चुकीच्या धोरणांचा फटकाही शेतकऱ्यांना बसल्याचे वारंवार दिसून आले आहे. जीडीपीवाढीसाठी दोन घटकांनी मागील वर्षात अपेक्षेपेक्षा जास्त महत्त्वाचे योगदान दिले आहे. एक म्हणजे २०२४ मध्ये दिसलेला याऊक किंमत निर्देशांक अत्यंत कमी राहिल्याने जीडीपीच्या वाढीमधील वास्तविक आणि अंदाजित फरक कमी झाला आहे. ही चलनवाढ तीन टक्के किंवा त्यापेक्षा कमी झाल्यामुळे वास्तविक आणि नाममात्र जीडीपीतील फरक सरासरी पातळीवर परत आली आहे. दुसरे म्हणजे, कर संकलनातील चढ-उतार आणि अर्थसंकल्पीय सबसिडी पेआउट्सनेदेखील जीडीपी वाढवण्यात मदत केली आहे.

सरकारी गुंतवणूक अर्थव्यवस्थेला भक्कम आधार देत आहे तर खासगी उपभोग खर्चामध्ये सापेक्ष कमकुवतपणा अजूनही कायम असून सध्या चार टक्क्यांवरच रेंगाळला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मागील वर्षाल तुलनेने कमकुवत स्थितीत असल्याचे दिसून आल्याने सरकारला आता गती द्यावी लागणार आहे. त्यामुळे सत्तेवर आलेल्या नवीन सरकारला ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या गतीसाठी खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. नव्या सरकारने शेतीला प्राधान्य दिल्यास अर्थव्यवस्थेचा वेग आणखी वाढण्यास मदत होईल. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र याच्याशी निगडित असलेल्या सुधारणा आगामी सरकार वेगाने अंमलात आणेल, अशी अपेक्षा आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# विजयसिंह पंडित हे सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व : विकास गायकवाड



गेवराई : प्रतिनिधी
स्वत :ला ओबीसी नेते समजणारे प्रा लक्ष्मण हाके यांनी गेवराई दौऱ्यावर असताना गेवराई मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंहजी पंडित यांच्या विषयी चुकीचे विधान करून गेवराई मतदार संघाची शांतता भंग करण्याचा जाणून बुजून प्रयत्न केला होता पण गेवराई तालुक्यातील सुजान नागरिकांनी तो हाणून पाडला गेवराई तालुक्याचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित हे सर्व समाज घटकांना सोबत घेऊन चालणारे व शिव . फुले .शाहू आंबेडकर आण्णाभाऊ साठे संत भगवान बाबा . माता जिजाऊ . पुण्यश्लोकअहिल्या देवी होळकर . संत सावता महाराज . मौलाना अब्दुल कलाम या सर्व महापुरुषांच्या व थोर संतांच्या विचारधारेवर चालणारे युवक नेतृत्व आहेत गेवराई तालुक्यामध्ये आत्तापर्यंत सर्व समाज बांधव मोठ्या गुण्या गोविंदाने राहत आहेत हे कदाचित लक्ष्मण हाके यांना माहीत नसावे त्यामुळे त्यांनी हे चुकीचे विधान केले .

बीड जिल्ह्यात कधीही कोणावरही काहीही अडचण आल्यास शिवछत्र परिवार त्यांच्या मदतीला प्रथम धावून जातो हे सर्व बीड जिल्ह्यातील जनतेने आपल्या डोळ्याने पाहिले आहे व स्वत : हे अनुभवले सुद्धा आहे तरी लक्ष्मण हाके यांनी ओबीसी समाजात व मराठा समाजात दरी निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये दोन समाजात तेढ निर्माण होईल असे चुकीचे वकृत्व करू नये यापुढे जर गेवराई मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या विषयी लक्ष्मण हाके यांनी चुकीचे वक्तृत्व केल्यास त्यांचे परिणाम वाईट भोगावे लागतील असा इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष चे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्ध पथकाद्वारे दिला आहे .

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कन्नड शहरात पोलिसांचे पथसंचालन

## शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती

कन्नड :आगामी गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि कोणत्याही अडचणीशिवाय पार पाडण्यासाठी कन्नड शहर पोलिसांच्या वतीने पत संचालन करण्यात आले .

या मोहिमेत पोलिसांनी शहरातील नागरिक, गणेश मंडळाचे पदाधिकारी यांच्याशी संवाद साधून धार्मिक–सांस्कृतिक कार्यक्रम शांततेत व शिस्तीत आयोजित करण्याच्या सूचना दिल्या . यावेळी वाहतूक नियंत्रण, ध्वनीप्रदूषण प्रतिबंध, मंडप परिसरातील स्वच्छता, प्रकाशव्यवस्था व सुरक्षितता यावर विशेष भर देण्यात आला .

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

गणेशोत्सव हा बंधुभाव व ऐक्य वाढवणारा उत्सव आहे .
उत्सव काळात कोणताही वाद, गोंधळ किंवा कायदा सुव्यवस्थेला बाधा आणणारी कृती टाळावी . सांस्कृतिक कार्यक्रम पोलीस प्रशासनाशी समन्वय ठेवूनच आयोजित करावेत .
सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता व नियमांचे पालन करून इतरांना गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी .

### नागरिकांचे स्वागत

शहर पोलिसांच्या या उपक्रमाचे गणेश मंडळे व नागरिकांकडून स्वागत करण्यात आले .
गणेशोत्सव हा सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सौहार्दाचा संदेश देणारा उत्सव असल्याने पोलिसांचे हे पत संचालन उपयुक्त ठरल्याचे मत व्यक्त झाले .

# अननस आणि सूर्यफुल आता रायगडमध्ये पिकणार; कृषी विभागाने घेतला पुढाकार!


**रायगड जिल्ह्याच्या कृषी विभागामार्फत यंदा नाविण्यपूर्ण उपक्रम राबवण्यासाठी विशेष पुढाकार**

## अलिबाग, पेणसह मुरुड तालुक्यातील 177 हेक्टरवर हे प्रकल्प राबवण्याचे नियोजन

## हळद लागवडीसोबतच अननस उत्पादन, शेततळी, सूर्यफूल, भूईमूग, काळीमिरी, करटोलीसह विविध पिकांच्या उत्पादनासाठी नवे प्रकल्प

**कृषीवेध**

●प्रणाली म्हात्रे
विक्रोळी, मुंबई



अलिबाग : रायगड जिल्ह्याच्या कृषी विभागामार्फत यंदा नाविण्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत . हळद लागवडीसोबतच अननस उत्पादन, शेततळी, सूर्यफूल, भूईमूग, काळीमिरी, करटोलीसह विविध पिकांच्या उत्पादनासाठी प्रकल्प राबवले जाणार आहेत . अलिबाग, पेणसह मुरुड तालुक्यातील 177 हेक्टरवर हे प्रकल्प राबवण्याचे नियोजन कृषी विभागाने केले असून यात 560 शेतकऱ्यांचा सहभाग आहे .

रायगड जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रापैकी 1 लाख 44 हजार हेक्टर क्षेत्र विविध हंगामातील पिकाखाली आहे . 1 लाख 4 हजार हेक्टरवर खरीप, 21 हजार हेक्टरवर रब्बीची लागवड होते . तर सुमारे 22 हजार हेक्टर क्षेत्रावर फळपिकाची लागवड होते . रायगड जिल्ह्यातील शेतीक्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे . वाढते नागरिकीकरण आणि न परवडणारा शेती व्यवसाय यामुळे शेतकरी शेतीपासून दूर जात आहे . मात्र उपलब्ध शेतीत नियोजन करून पिके घेतल्यास शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो . त्यासाठी जिल्ह्याचा कृषी विभाग प्रयत्न करत आहे .

रायगड जिल्ह्याच्या कृषी विभागामार्फत यंद हटके शेती उपक्रम राबवले जात आहेत . हळद लागवड यापूर्वीच सुरू झाली आहे . आता अननस उत्पादन, शेततळी, सूर्यफूल, भूईमूग, करटोलीसह विविध पिकांच्या उत्पादनासाठी प्रकल्प राबवले जाणार आहेत .

अलिबाग विभागामार्फत सरी वरंबा पद्धतीने हळद लागवड प्रकल्प 20 हेक्टरवर केला जाणार आहे . यात 50 शेतकऱ्यांचा सहभाग असणार आहे, शेततळ्यांतील मत्स्योत्पादनासाठी 30 शेतकरी तक 50 शेतकरी 10 हेक्टरवर अननसाचे पिक घेणार आहेत .

पेण विभागामार्फत जेएसडब्ल्यू यांच्या सहकार्याने 50 शेतकऱ्यांसाठी 20 हेक्टरवर करटुली लागवड, 20 शेतकऱ्यांसाठी शेततळ्यातील मत्स्योत्पादन, 100 शेतकऱ्यासाठी 50 हेक्टरवर घन जीवामृत निर्मिती व वापर प्रकल्प, 20 हेक्टरवर 50 शेतकऱ्यांसाठी सरी वरंबा पद्धतीने भूईमूग लागवड प्रकल्प, 25 हेक्टरवर 50 शेतकऱ्यांसाठी सूर्यफूल, 12 हेक्टरवर 30 शेतकऱ्यांसाठी भूईमूग लागवड केली जाणार आहे .

मुरुड तालुक्यात 10 हेक्टरवर 50 शेतकऱ्यासाठी अननस लागवड प्रकल्प, 10 हेक्टवर 30 शेतकऱ्यांसाठी आंबा, सुपारी, नारळ पिकामध्ये आंतरपिक काळीमिरी उत्पादन प्रकल्प आणि 20 शेतकऱ्यासाठी शेततळ्यामध्ये मत्स्योत्पादन प्रकल्प हाती घेतले जाणार आहेत .

# भारताची अर्थव्यवस्था






आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ( आयएमएफ ) च्या मतानुसार २०२४ मध्ये अमेरिकेची अर्थव्यवस्था २ .७ टक्क्यांनी वाढेल तर युरोझोन आणि चीनमध्ये अनुक्रमे ० .८ टक्के आणि पाच टक्के वाढ अपेक्षित आहे . या जागतिक मंदीच्या काळात भारताच्या जीडीपीमधील निर्यातीचा याटा २०२२–२३ मधील २३ .९ टक्क्यांवरून २०२४ मध्ये २२ .७ टक्क्यांवर घसरला . तथापि, ढोबळ स्थिर भांडयलनिर्मिती हा प्रमुख गुंतवणूक निर्देशक वार्षिक अंदाजे नऊ टक्क्यांनी वाढला आहे . लोकसभा निवडणुकांचे सन्न संपले असून नवीन सरकारवर अर्थव्यवस्थेची स्थिती सुधारण्याची जबाबदारी आहे . मात्र स्थिती वाटते तेवढी अवघड नाही .

याचे कारण, भारताची वित्तीय तूट २०२३–२०२४ मध्ये १६ लभ ५४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली असून पुढील काळात १७ लक्ष ८६ हजार कोटी रुपये राहील, असा अंदाज होता . म्हणजेच वर्षभरात जेवढी तूट येईल असा अंदाज होता, त्यापेक्षा ती सुमारे पाच टक्के कमीच आहे . देशाच्या महालेखापालांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सरलेल्या आर्थिक वर्षात केंद्र सरकारची वित्तीय तूट जीडीपी किया सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ५ .६ टक्के आहे . सुधारित ५ .८ . टक्क्यांच्या अंदाजापेक्षा ती कमीच आहे . याचा अर्थ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आर्थिक शिस्त पाळून कारभार केला आहे . सुदैवाने गेल्या आर्थिक वर्षात करमहसुलापोटी सरकारला समोर ठेवलेल्या उद्दिष्टाएवढेच म्हणजे २३ लाख कोटी रूपये मिळाले . त्या तुलनेत सरकारचा एकूण खर्च ४४ लाख कोटी रुपये आहे . तो मूळ लक्ष्याच्या ९९ टक्के इतका आहे . सामान्यत : कोणत्याही पक्षाचे सरकार असो, उत्पन्न किंवा खर्चाची लक्ष्ये पूर्ण केली जात नाहीत . मुळात सरकारने करसंकलनाचे काम कार्यक्षमतेने करून जास्त महसूल मिळवला आहे . अनुदानांवरील खर्चाला कात्री लावल्यामुळे तुटीचे लक्ष्य जवळपास साध्य करणे शक्य झाले आहे .● पान २ वर . . .

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष




# करराटे चॅम्पियन चे श्री पुरुषोत्तम अर्बन माजलगाव कडून कौतुक

माजलगाव / प्रतिनिधी :

संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय खुले कराटे चॅम्पियनशिप मध्ये सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी माजलगाव चे १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता या स्पर्धांमध्ये श्रीलंका. विदेशातून व आपल्या भारतातून एकूण ३७५ विद्यार्थी सहभाग झाले होते व या सर्व सर्व खेळाडू मधून आपल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा इतिहास घडविले व दोन वेळेस आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये चॅम्पियनस टीम चे किताब पटकवले .काता . व कुमिते . या दोन्ही प्रकारामध्ये विद्यार्थ्यांनी एकूण ३० पदका ची कमाई केली पदक जिंकणारे सर्व विद्यार्थ्यांचे नाव . मुलींमध्य . भैरवी गोरे . भक्ती कोल्हे . श्रावणी मुजमुले . मुलांमध्ये . प्रेम पुरुषोत्तम काठुळे . रोहित धारक . मयूर कंकाळ . उदय ढेरे . अर्कम शेख . अफान शेख . आयान शेख . साद शेख . अर्शद सय्यद . साद सय्यद . गोविंद ढगे . वैभव साळवे . हे सर्व विद्यार्थी पुन्हा एकदा चॅम्पियन्स ठरले व या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक रेन्शी मजेद शेख सर . बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर . यांनी मार्गदर्शन केले यांच्या यशबद्दल सर्व पालका वर्ग व श्री पुरुषोत्तम अर्बन परिवार माजलगाव च्या वतीने सर्व चॅम्पियन चे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे रेसिडेन्सी शेख माजेद सर यांचे अभिनंदन करण्यात आले व संपूर्ण तालुका मध्ये कौतुक या मुलाचे होत आहे तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा सुद्धा दिल्या गेल्या आहेत

पुन्हा एकदा या सर्व विद्यार्थ्यांनी माजलगाव च नाव रोशन केलेला आहे त्यामुळे विविध संघटना विविध स्तरातून या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे .

## आ. भुमरे यांच्या हस्ते शहरातील विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण

पैठण : सर्जेराव खडसन



छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे विद्यमान खा .संदीपान पा .भुमरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आमदार विलास ( बापू )भुमरे यांच्या हस्ते पैठण शहरातील विविध नियोजित विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा मोठ्या धूमधडाक्यात पार पडला यामध्ये प्रामुख्याने अन्नपूर्णा नगर येथील महादेव मंदिर, तसेच नाथ मंदिर कावसनकर स्टेडियम जवळील भव्य प्रवेशद्वार, महावीर चौक येथील भव्य कमान, भाऊसाहेब नगर, अन्नपुर्णा नगर येथिल खुल्या जाग्यातील संरक्षण भिंत कामांचा लोकार्पण तसेच विविध विकास कामाच्या भूमिपूजन सोहळ्या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी आमदार विलास बापू भुमरे यांनी पैठण शहरातील नागरिकांना स्वच्छ व नियमित पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगती पथावर असून यासोबतच शहर परिसरात पथदिवे, नाथ मंदिराच्या विकासासह संत ज्ञानेश्वर उद्यानात ही अनेक विकास कामे केली जात असल्यामुळे शहरातील विविध छोट्या मोठ्या उद्योगाला चालना मिळुन पर्यटन व श्रीक्षेत्र पैठणच्या विकासात भरच पडणार आसल्याचे यावेळी सांगितले . या कार्यक्रमाप्रसंगी पैठण न .प .मुख्याधिकारी डॉ .पल्लवी अंभोरे, दूध महासंघाचे नंदलाल पा .काळे, किशोर चौधरी, मा .नगराध्यक्ष राजू गायकवाड, सोमनाथ परदेशी, तुषार पाटील, पुष्पाताई गव्हाणे, अजित पगारे, बादशहा परळकर ईश्वर दगडे, कृष्णा मापारी, बाळू माने, किशोर तावरे, आबा गिरगे, मनोज गायके, संजय भंडारी, संदीप मडके, लालु वीर, गजू ईच्छय्या यांच्यासह अनेक शिवसैनिक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

## भिसेवाडीचे जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी थेट विधानभवनात

● पान १ वरून . . . विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा, त्यांनी काही विद्यार्थ्यांसोबत विधानभवनाला भेट दिली . या दौऱ्याचा उद्देश विद्यार्थ्यांना लोकशाहीचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विधानभवनाचे कामकाज समजावून सांगणे हा होता . लोकशाहीचा अनुभव :- विद्यार्थ्यांनी सभागृहाची रचना, कामकाज करण्याची पद्धत आणि लोकप्रतिनिधींची भूमिका जवळून अनुभवली . यामुळे त्यांना शिक्षण आणि लोकशाही यांच्यातील संबंध अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत झाली .

विधानभवनाची सफर :- या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांना विधानभवन परिसराची सफर घडवून आणली गेली . यामध्ये त्यांना विधिमंडळाची कार्यपद्धती, कायदे कसे बनतात आणि लोकप्रतिनिधींचे निर्णय घेण्याचे अधिकार याबद्दल माहिती देण्यात आली .प्रेरणादायी उपक्रम :- राजकीय नेत्यांनी अशा प्रकारे विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी करून घेणे, हा एक स्तुत्य उपक्रम मानला जातो . यामुळे तरुणांमध्ये नागरिकशास्त्र आणि देशाच्या राज्यकारभाराबद्दल जागरूकता वाढते .हा उपक्रम अंबादास दानवे यांनी त्यांच्या पदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वी केला होता, ज्यायोगे त्यांनी राजकीय जबाबदारीसोबतच सामाजिक जाणीव जपण्याचा संदेश दिला .छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांच्या मुंबईतील विधानभवनाच्या अभ्यासदौऱ्याचे वर्णन केले आहे .हा दौरा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता .यावेळी विद्यार्थ्यांनी विधानसभेचे, विधान परिषदेचे आणि मध्यवर्ती सभागृहाचे कामकाज जवळून पाहिले . त्यांना विधानभवनाच्या कामकाजाबद्दल प्राथमिक माहिती मिळाली .या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी अनेक निरागस प्रश्न विचारले, ज्यामुळे त्यांचा लोकशाही प्रक्रियेबद्दलचा आत्मविश्वास आणि जिज्ञासा दिसून आली .

या प्रसंगी अंबादास दानवे यांचा सत्कार करण्यात आला आणि विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या .

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक फेरोज शेख, सहशिक्षक विजय मितेवाड, अर्जुन जाधव, गटशिक्षण अधिकारी हेमंत उशीर, केंद्रप्रमुख पी . जी . पवार, संतोष जाधव, संतोष आढाव तसेच पालक उपस्थित होते .

# डी.जे. मुक्त माजलगांव या संकल्पनेची शहर पोलीसांकडुन सुरुवात; दोन डीजे वर कार्यवाही

➤ माजलगाव / प्रतिनिधी : सण उत्सवामध्ये, महापुरुषांच्या जयंती मिरवणुकीमध्ये तसेच लग्न समारंभामध्ये, डीजे लावुन ध्वनी प्रदुषणाचे प्रमाण खुप वाढलेले आहे . मानवी आरोग्यास ते धोकादायक असल्याने मा . न्यायालयाने डीजेवर बंदी आणत आवाजावर नियम घालुन दिलेले आहेत .



तसेच नागरीकांकडुन सुध्दा डीजे च्या पोलीस स्टेशनला वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत . त्यामुळे यापुढे येणारे सर्व सण, उत्सव व जयंती हे डीजे मुक्त करण्याचा माजलगांव शहर पोलीसांनी संकल्प केला असुन आगामी सण, उत्सवामध्ये किंवा महापुरुषांच्या जयंतीमध्ये नागरीकांनी डीजे न लावता पारंपारीक वाद्याचा वापर करण्याचे आवाहन पोलीसांतर्फे करण्यात येत आहे . वाहनामध्ये





फेरबदल करुन डी .जे . बसवुन वापरणाऱ्या दोन वाहनाविरुध्द पोलीसांकडुन कारवाई करण्यात आली असुन कोणीही वाहनामध्ये मोडीफाय करुन डी .जे . बसवुन वापरतांना दिसुन आल्यास डायल ११२ क्रमांकावर कॉल करुन पोलीसांना माहीती देण्याचे आवाहन शहर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यातळ यांच्या तर्फे करण्यात आले आहे .

या कार्यवाही मुळे डीजे वाल्यात चांगलीच जरब बसली आहे .

# पाण्याची आवक वाढली माजलगाव धरण ओव्हरफ्लो

➤ सात दरवाज्यातून १३ हजार क्युसेसने सिंधफना पात्रात विसर्ग ➤ अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता धरणावर तळ ठोकुन

➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ

माजलगाव धरणातील पाण्याची पातळीत वाढ होत असतानाच रात्री दहा वाजता दरम्यान सोदलेल्या तीन दरवाज्याने पाणी पातळी नियंत्रित राहत नसल्याने सकाळी सव्वा अकरा वाजता पुन्हा पाच दरवाज्याद्वारे सिंधफना नदी पात्रात ९ हजार ८८६ क्यूसेसने सोडण्यात आले आसल्याने सिंदफना नदी पात्रातील पाण्याची वाढ होत असताना पुरजन्य परिस्थिती निर्माण होऊ शकते धरणातून रात्री १० वाजण्याच्या सुमारास गेट उघडून धरणाच्या सांडव्याद्वारे दुकाना नदीपात्रात ५९३२ क्यूसेसने पाणी सोडण्यात आले होते .

धरण पाणलोट क्षेत्रातील धरणात पाण्याची आवक ररहाजार क्यूसेसने वाढ होत असताना धरणातील पाण्याची पातळी जास्त वाढत असल्याने आज सकाळी सच्चा अकरा वाजण्याच्या दरम्यान आणखीन दोन गेट उघडून ३९५४ क्यूसेसने नदी पात्रात वाढ करुन एकूण ९ हाजार ८८५ क्यूसेसने सिंदफना नदी पात्रात पाच गेट द्वारे पाणी सोडण्यात आले . पाण्याच्या आवक नुसार गेट कमी जस्त करण्यात येणार असल्याची माहिती शाखा अभियंता गणेश झापुडगे यांनी दिली .

### सिंदफना नदीत वाढता प्रवाह :

● माजलगाव धरणातील पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरण ओव्हरफ्लो झाले असून सात दरवाजांतून १३९८९ क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू आहे . त्यामुळे सिंधफना नदीच्या पात्रातील पाणी झपाट्याने वाढत असून खालच्या गावांमध्ये पुराचा धोका निर्माण झाला आहे . नागरिकांनी सतर्क राहण्याचे तसेच नदीपात्रात किंवा काठावर जाणे टाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे .

### धरणगेटवर उसळली बघ्यांची गर्दी

● माजलगाव धरणाचे दरवाजे उघडताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे . धरणगेटजवळ शेकडो बघ्यांची गर्दी झाल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे . जमावावर नियंत्रण ठेवण्याची गरज असून नागरिकांनी धरणाजवळ जाण्याचे टाळावे, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे . सुरक्षा उपाययोजना वाढविण्याबाबतही प्रशासनाकडून हालचाली सुरू आहेत .



# हिंद की चादर निमित्त पोहरादेवी येथे राज्यस्तरीय चर्चासत्र

## धर्मगुरू आ.बाबुसिंग महाराज,शदरजी ढोले रामेश्वरभाऊ नाईक यांचा सहभाग

गेवराई : प्रतिनिधी

हिंद की चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांची ३५० वी समागम निमित्त राज्यस्तरीय महाचर्चासत्र वाशीम जिल्ह्यातील बंजारा तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथे रविवारी आयोजित करण्यात आली आहे .

या चर्चासत्राच्या निमित्ताने बंजारा धर्मगुरू आ बाबुसिंगजी महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ धर्म जागरण अभियानचे प्रमुख शरदरावजी ढोले , महेंद्रजी रायचुरा , मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख तथा गोदरी कुंभमेळ्याचे संयोजक रामेश्वर भाऊ नाईक व बंजारा तीर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते भगवंत सेवक किसनभाऊ राठोड यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे .याच कार्यक्रमांमध्ये महायुती सरकारचा महत्त्वाकांक्षी अभियान भटके विमुक्त दिवस देखील साजरा करण्यात येणार आहे .या दोन्ही कार्यक्रमाला बंजारा भटके मुक्त भाजपा व विविध संघटनेच्या नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे

इंग्रजांच्या जोखडातून मुक्ती मिळाल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, हे खरं असलं तरी या देशातील करोडोंच्या संख्येने असणारे व जगण्यासाठी रोज मरण यातना भोगत असलेल्या भटके विमुक्तांना ३१ ऑगस्ट १९५२ म्हणजे तब्बल पाच वर्षे उशिरा देशातील अन्यायकारक व्यवस्थेच्या जोखडातून स्वातंत्र्य मिळाले आहे . हि ऐतिहासिक आठवण जागवणारा दिन यावर्षी भाजपा-महायुती सरकारने भटके विमुक्त दिवस म्हणून राज्यभर साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे .

त्या अनुषंगाने देशातील बंजारा समाजाची पवित्र काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वाशिम जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथील भक्तीधाम या धार्मिक संस्थानात रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत भटके विमुक्त दिवस अत्यंत थाटामाटात साजरा करण्यात येणार आहे .भटके विमुक्त समाजासाठी सदरील दिवस केवळ उत्सव नसून नव्या इतिहासाची नांदी आहे .बंजारा व समस्त भटके विमुक्त समाजाचा सर्वांगीण विकासाचा संकल्प पोहरादेवीच्या पवित्र भूमीतून मांडला जाणार आहे .




धर्मगुरु महंत बाबुसिंग महाराज

बंजारा समाजाची देशपातळीवरील सर्वात मोठी संघटना म्हणून नावाजलेल्या असलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने सदरील भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .या कार्यक्रमाला बंजारा समाजाचे धर्मगुरू तथा आमदार बाबुसिंगजी महाराज, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक, बंजारा तिर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते, भगवंत सेवक किसनभाऊ राठोड तसेच भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ नेते मंडळी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे .

भटके विमुक्त हा दिवस राज्य व जिल्हा स्तरावर साजरा करण्यात यावा, सदर दिवशी भटक्या विमुक्त समाजाच्या संस्कृतीचे जीवनमूल्ये, परंपरा दर्शविणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व माहीतीपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे असे आवाहन महायुती सरकारच्या वतीने करण्यात आले आहे . शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भटके विमुक्त समाजाच्या वर्तमान काळातील सामाजिक शैक्षणिक आर्थिक सांस्कृतिक धार्मिक व राजकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे . बंजारा, लबाणा सह इतर भटक्या विमुक्त जातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी, भटक्या विमुक्तांच्या जीवनात अमुलाग्र बदल व्हावा यासाठी पोहरादेवी येथील कार्यक्रमात अनेक ठराव पारित करून महायुती सरकारकडे रामेश्वरभाऊ नाईक व किसनभाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली सादर केले जाणार आहेत . सदरील कार्यक्रमासाठी महंत जितेंद्र महाराज, कबीरदास महाराज, सुनील महाराज, शेखर महाराज, साहेबराव शास्त्री महाराज, यशवंत महाराज, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष विलासभाऊ राठोड, राष्ट्रीय बंजारा राजकीय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा .पी .टी .चव्हाण, राष्ट्रीय महासचिव तथा भाजपचे नेते अँड .पंडित भाऊ राठोड, प्रदेशाध्यक्ष भिकणभाऊ जाधव, राष्ट्रीय प्रवक्ते मधूकरभाऊ जाठोत, डॉ . जगदिशभाऊ सकवाण, प्रदेश प्रवक्ते अमोलभाऊ पवार, ओएसडी निलेश भाऊ जाधव, युवा नेते युवराज राठोड, प्रदेश उपाध्यक्ष प्रेमकिसन राठोड यांची देखील उपस्थिती राहणार आहे .

तरी सदरील चर्चासत्रात बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कृष्णा चव्हाण, राजेश पवार, उमेश राठोड, पवन जाधव, राजु राठोड, एकनाथ आडे, विकास जाधव, शामभाऊ राठोड, सत्यम पवार यांनी केले आहे .

## अभिनेत्री प्रिया मराठेचे कर्करोगामुळे ३८ व्या वर्षी निधन



मुंबई : मराठी मनोरंजनसृष्टीतील अभिनेत्री प्रिया मराठेचे कर्करोगामुळे ३८ व्या वर्षी निधन झाले . कर्करोगाचे निदान झाल्यानंतर मागील अनेक दिवसांपासून प्रियावर उपचार सुरू होते . या उपचारांना प्रियाचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही . अखेर प्रियाने ३८ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला .

प्रिया मराठेने चार दिवस सासूचे, पवित्र रिश्ता, तू तिथे मी, स्वराज्यरक्षक संभाजी, या सुखांनो या, या मालिकांमध्ये अभिनय केला होता . प्रियाच्या अभिनयाला प्रेक्षकांकडून कौतुकाची पावती मिळाली होती . यामुळे प्रियाच्या अकाली निधनाने चाहत्यांना धक्का बसला आहे . प्रिया आजारी आहे, तिला कर्करोग झाला आहे याची माहिती अनेकांना नव्हती . यामुळे तिच्या निधनाची बातमी अनेकांसाठी मोठा धक्का ठरली आहे .

निवडक मराठी आणि हिंदी टीव्ही मालिका तसेच मोजक्या चित्रपटांमधून प्रियाने अभिनय केला होता . पवित्र रिश्ता या हिंदी टीव्ही मालिकेमुळे प्रिया घराघरात पोहोचली होती .

पाटबंधारे खात्याचा दुर्लक्ष पणा ➤ शासकीय फळ रोपवाटिकेचे मोठे नुकसान - गणेश बादाडे

# माजलगावच्या कृषी कार्यालियाचा पूर्ण रस्ता पाण्या खाली !

माजलगाव : प्रतिनिधी

येथील तालुका कृषी कार्यालयाचा येण्या-जाण्याचा सीड फार्म या ठिकाणचा जवळपास ४०० मीटरचा रस्ता पाटबंधारे खात्याच्या दुर्लक्षामुळे पूर्णत : पाण्यात असून, त्यामुळे तालुका कृषी कार्यालयात अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकऱ्यांना आपल्या कामास ये-जा करण्यास अत्यंत अडचणीचा सामना करावा लागत असून, चक्क पाण्यातून जावे लागत आहे . त्यामुळे शेतकऱ्यांची कामे खोळंबली असून, या प्रकरणी पाटबंधारे खात्याने तत्काळ दखल घेऊन बाजूची जलवितरणिका दुरुस्त करावी, अशी मागणी होत आहे .

माजलगाव येथील तालुका कृषी कार्यालय हे शहरालगत असलेल्या सिंदफणा नदीकाठच्या शासकीय सीड फॉर्म या जमिनीत बांधलेले आहे . याच्या बाजूलाच तालुका फळ रोपवाटिका देखील येथे आहे त्यामुळे संपूर्ण तालुक्यातून शेतकऱ्यांचा वावर येथे दररोज होतो . विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी या ठिकाणी ये-जा करतात . या वितरिकेतून ढोरगाव, घळाटवाडी, हिंगणवाडी, पवारवाडी या भागातील शेतकऱ्यांना पाणी वितरण केले जाते . ओलांडून पुढे गेली आहे . हा महामार्ग होण्यापूर्वी या वितरिकेच्या खालून एक पूल बांधण्यात आलेला होता त्यातून बाजूच्या शेतातील साचणारे पावसाचे पाणी या पुलाच्याद्वारे सिंधफणा नदीपात्रात जात होते . परिणामी वितरिकेच्या दोन्ही बाजूने प्रचंड पाणी पावसाळ्यात साचून राहत आहे .



वितरिकेला खेटून असलेले पाणी व त्याच्या रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेली फळ रोपवाटिकेतील शासकीय चिकूची जवळपास आठ एकर बाग पूर्णत : पाण्यात राहिलेली आहे . त्यातूनच रस्ता गेल्यामुळे या रस्त्यावरून कृषी कार्यालयात जाणे अवघड झाले आहे .

तेथे पायी तर कोणासही जाता येत नाही, परंतु मोटारसायकलवर जात असताना देखील चिखलात व पाण्यात घसरून शेतकरी पडत आहेत, अशी परिस्थिती येत आहे . या परिस्थितीमुळे पाटबंधारे खात्याने याची तत्काळ दखल घेऊन येथे साचणारे पाणी काढून दिल्यासच यातून मार्ग निघणार असल्याने तातडीने मार्ग काढावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे .

### कार्यालय बंद राहण्याची शक्यता :



सीड फॉर्मच्या हद्दीमध्ये आमच्या कार्यालयाकडे येणाऱ्या रस्त्यावर व रोपवाटिकेमध्ये प्रचंड पाणी साचत असल्याने शासकीय फळ रोपवाटिकेचे मोठे नुकसान तर होतच आहे तसेच चिकूच्या बागेचे देखील मोठे नुकसान झाले आहे . आम्हाला देखील येण्यास रस्ता नाही त्यामुळे आम्ही माजलगाव पाटबंधारे विभाग कार्यालयाशी संपर्क केलेला असून, या कार्यालयाने मात्र अद्यापपर्यंत त्याबाबत कुठलीही कारवाई केलेली नाही . भविष्यात जास्त पाऊस झाल्यास रस्ता बंद होऊन कार्यालय देखील बंद राहण्याची शक्यता आहे .

-गणेश बादाडे, तालुका कृषी अधिकारी, माजलगाव